Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 2.1506(UIF)
Volume-4 | Issue-1 | Feb-2014
Available online at www.isrj.org

# एकोणिसाव्या शतकातील मराठी गद्य: स्वरुप आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी

**डॉ . तानाजी अंबादास देशमुख**

मराठी विभाग, वसुंधरा कला महा. जुळे सोलापूर.

***प्रस्तावना :***

आधुनिक भारताच्या इतिहासात राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, बदलाच्या दृष्टीने एकोणिसावे शतक अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. ब्रिटिशांच्या आगमनाबरोबरच आधुनिक ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, प्रशासन व प्रगत जीवनशैली इथे आली व त्यांचा हळूहळू परंतु खोलवर परिणाम भारतीय समाजजीवनावर होऊ लागला. पाश्चात्य शिक्षण, पाश्चात्य वाड्:मय व त्यांच्या आधुनिक संस्कृतीने भारावलेला नवीन तरुण वर्ग , पाश्चात्यांच्या प्रगतीची व आपल्या अधोगतीची कठोर चिकित्सा करु लागला. यातूनच पारंपरिक भारतीय समाजव्यवस्था, धर्मग्रंथ, परंपरा, शिक्षण वगैरेंची मूलगामी चिकित्सा होऊ लागली. व्यक्तिगत व संघटनात्मक पातळीवर समाजसुधारणा व धर्मचिकित्सेचे प्रयत्न होत होते. यालाच भारतीय प्रबोधनकाळ असे म्हणतात. स्थितिशील, पोथीवादी व गतानुगतिक वृत्तीच्या समाजाला विचारप्रवृत बनविण्यासाठी या काळात प्रबोधनपर वैचारिक वाड्:मय मोठया संख्येने निर्माण झाले. एकूणच मराठी समाज व साहित्याला आधुनिकतेचे रुप याच प्रबोधन पर्वामुळे मिळाले.या काळातील निवडक गद्य वाड.मय भास्कर भोळे यांनी एकोणिसाव्या शतकातील मराठी गद्य (खंड-१,२) यांमध्ये संपादीत केले आहे. यांपैकी प्रथम खंडाचा परामर्श घेण्याचा प्रयत्न या शोधनिबंधात केला आहे.

एकोणिसाव्या शतकातील मराठी गद्य (खंड-१) या भास्कर भोळे संपादीत ग्रंथामध्ये एकूण एकोणवीस गद्यवेच्याचा समावेश करण्यात आलेला आहे. हे सर्व वेचे हे वैचारिक आहेत. यामध्ये प्रामुख्याने शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय विषयांवरील गद्यांची निवड करण्यात आली आहे.

सन १८०० ते १८७४ या काळखंडास भाषांतर युग म्हणून संबोधले जाते. कारण या काळात स्वतंत्र वाड्:मय निर्मिती मोठया प्रमाणात झाली नसली तरी विपूल प्रमाणात भाषांतरीत ग्रंथ निर्माण झाले. सन१८०१ ते १८३२ या काळात सेरामपूर मिशन छापखान्यात चाळीस वेगवेगळया भाषांमध्ये बारा हजार पुस्तके प्रकाशित झाली होती.या ग्रंथामधील 'ग्रंथांची भाषांतरे किंवा नवीन ग्रंथ करणारांस बक्षिसाविषयीचें प्रसिध्दिपत्र' या लेखांमधून जॉज जार्विस यांनी भाषांतराचे सांगितलेले स्वरुप समजते. या काळात ब्रिटिशांनी भाषांतर करण्यास प्रोत्साहन दिले. याची नांदी म्हणजे एकोणिसाव्या शतकातील मराठी गद्य, खंड -१ मध्ये समाविष्ठ करण्यात आलेले हे प्रसिध्दिपत्र होय. भाषांतर युगाचे प्रवर्तन करण्याचे मुख्य श्रेय 'बॉम्बे एज्युकेशन सोसायटी' या संस्थेला जाते. या संस्थेचे अध्यक्ष एल्फिन्स्टन हे होते. या संस्थने मुबईची हैदशाळा व शाळापुस्तके मंडळीची स्थापना केली. मुबईच्या हैदशाळेचे कार्यवाहक श्री. जॉर्ज जार्विस हे होते त्यांनी हे परिपत्रक १८२५ साली काढले. या परिपत्रकात महाराष्ट्राच्या भावी शैक्षणिक विकासाची बीजे आहेत. त्याच प्रमाणे मराठी व गुजराथी या भाषांना शिक्षणाचे अधिकृत धोरण म्हणून दिलेली मान्यता ही आहे. मराठी व गुजराथी पुस्तकांचे भाषांतर करणा-यांसाठी अत्यंत महत्त्वाच्या १० सूचना करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये बाळबोध अथवा प्रौढग्रंथ भाषांतरीत करण्यावर भर देण्यात आला आहे. शंभर रुपये पासून पाच हजार पर्यंत अशा स्वरुपाच्या पारितोषिकांच्या भरघोस रक्कमाही नमूद करण्यात आल्या आहेत. या परिपत्रकांमध्ये कोश, व्याकरण, शिक्षणशास्त्र, गणित, शिल्पविद्या, ज्योतिष, सिध्दपदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, शारीरवैद्यक, इतिहास, भूगोल, कथात्म साहित्य अशा अनेक विषयांवरील ग्रंथ भाषांतरीत करण्याची अपेक्षा केली आहे. त्यामुळे निश्चितच मराठी ग्रंथसंपदेत मोलाची भर पडली.

ग्रंथामध्ये शिक्षण विषयक विचार विविध लेखात स्फूट स्वरुपात आले आहेत. या काळात प्रबोधनकारांच्या विचारांच्या व कार्याचा सर्वाधिक भर शिक्षण प्रसारावर होता. या ग्रंथामधील लेखांमधून शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे साधन सूचित केले आहे. या लेखनातून शासनाने सर्वात प्रथम शिक्षणाला महत्त्व देण्याचा आग्रह धरला आहे. 'दर्पण मधील काही लेख' या लेखात दि.१२/११/१८३१ ते दि.१२/१०/१८३२ या काळातील दर्पण मधील चार लेख समाविष्ठ केले आहेत. यामध्ये १) प्रस्ताव २) कलकत्यामध्ये हिंदू नाटकशाळा चालू झाली ३) विद्या हे बळ आहे. ४) स्वतंत्र व पक्षपातरहित वर्तमानपत्रापासून होणारी कार्ये आणि फळे असे लेख आहेत, 'विद्या हें बळ आहे' या लेखात दर्पणकारांनी शिक्षणाचे व शिक्षकांचे महत्त्व विशद केले आहे. तत्कालीन शिक्षण पध्दतीत न्याय आणि वेदांत या विषयांवरील शिक्षणांवरच अधिक लक्ष देतात अशी टीका ही त्यांनी केली असून कला, कौशल्य , संसार उपयोगी व इंग्रजी मधून शिक्षण देण्याचा आग्रह त्यांनी धरला आहे.'आपला धंदा कोणता व कसा करावा' हा लेख दादोबा पांडुरंग यांच्या दादोकृत शिशुबोध या ग्रंथातीत विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार शिक्षण द्यावे, असे दादोबांचे द्रष्टे विचार आजही आपणांस प्रेरणादायी ठरतात .

आधुनिक भारताच्या इतिहासात राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, बदलाच्या दृष्टीने एकोणिसावे शतक अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.या काळात मराठी नियतकालिकांचा उदय मोठया प्रमाणात झाला. नियतकालिकाचे स्वरुप कसे असावे. त्यामध्ये कोणती माहिती असावी या संदर्भात विपूल लेखन झाले आहे. त्यातील काही लेखन या गद्यवेच्यांमध्ये आले आहे. 'दर्पण मधील काही लेख'या लेखात प्रस्ताव हा पहिलाच लेख या दृष्टीने महत्त्वाचा आहे.जांभेकरांनी आपल्या नियतकालिकाचे स्वरुप व भूमिका प्रस्ताव या पहिल्या भागात नमूद केली आहे. दर्पणचा पहिला अंक ६ जानेवारी १८३२ या दिवशी छापला जाईल, विलायती विद्यांचा अभ्यास व ज्ञानप्रसार हा महत्त्वाचा उद्देश दर्पणचा असेल, हे पत्रक एका बाजूस मराठी व दुस-या बाजूस इंग्रजी भाषेत असेल. तसेच मनोरंजन करणे, वर्तमानकालीन घटनांचा परामर्श घेणे, समाजाला योग्य मार्ग दाखविणे ही भूमिका दर्पणची होती. या घटनांचा समावेश प्रस्ताव या मध्ये आला आहे. स्वतंत्र व पक्षपातरहित वर्तमानपत्रापासून होणारी कार्ये आणि फळे या लेखात दर्पणकारांनी नियतकालिकांची कामगिरी नमूद केली आहे. तसेच लबाडी, लाच याबाबतची न्यायव्यवस्था व न्यायाधिशांची भूमिका स्पष्ट केली आहे. ब्रिटिशांमुळे लाच व लबाडी कमी झाली आहे असे मत त्यांचे योग्य वाटते.

या ग्रंथामध्ये अर्थशास्त्रीय विचार व्यक्त करणारे चार लेख समाविष्ठ करण्यात आले आहेत. 'आपला धंदा कोणता व कसा करावा' हा लेख दादोबा पांडुरंग यांच्या 'दादोकृत शिशुबोध' या ग्रंथातील पृष्ठ २९ ते ३६ वरील आहे. या लेखात १३ मुद्यात व्यवसायाचे स्वरुप , महत्त्व, व्यवसाय करण्याची पध्दत , व्यवसायातील समस्या यावर सोदाहरण भाष्य दादोबांनी केले आहे. स्वयंपूर्ण खेडयातील व्यवसाय, बलुतेदारीचे महत्त्व त्यावर असलेला वर्णव्यवस्थेचा पगडा नमूद करुन व्यवसायाभिमुख शिक्षणाचा आग्रह धरला आहे. यावरुन त्यांची दूरदृष्टी लक्षात येते. रामकृष्ण विश्वनाथ यांनी 'हिंदुस्थानची प्राचीन व सांप्रतची स्थिती व पुढे काय त्याचा परिणाम होणार याविषयी विचार' या लेखात ब्रिटिशांच्या भारतीयांच्या शोषनाधिष्ठित धोरणाचा खरपूस समाचार घेतला असून भारतीयांना आर्थिक प्रगतीसाधण्यासाठी काही उपाय सूचविले आहेत. हे उपाय आजही उपयोगी आहेत. कच्चा मालाचे पक्क्या मालात रुपांतर करणारे उद्योग भारतातच असावेत, समाजाला व्यावसायाभिमुख शिक्षण द्यावे.उद्योग-धंद्यात यांत्रिकीकरणाचा वापर करावा,मोठया उद्योगासाठी भागभांडवल उभा करावे, आधुनिक यंत्रे बाहेरुन आणावीत, सोन्यांच्या खाणीचे उत्खनन सूरु करावे. हे उपाय उत्पादन वाढीसाठी व आर्थिक सक्षमतेसाठी अत्यंत उपयोगी आहेत.हरी केशवजी पाठारे हे एक साहित्यिक व भाषांतरकार म्हणून प्रसिध्द आहेत. त्यांच्या 'देशव्यवहारव्यवस्था' या लेखात शेती व शेतकरी यांविषयी मूलभूत प्रश्न मांडले आहेत. भारत हा शेतीप्रधान देश आहे. शेती सुधारली तरच ख-या अर्थाने भारतीय उत्पन्नात वाढ होणार आहे. याची जाणीव या लेखात प्रकर्षाने जाणवते. लेखात स्थायी स्वरुपाची शेती, शेतीसाठी आधुनिक अवजारे, तांत्रिक शेती करण्याची पध्दती,सुधारित बियाणे, स्थावर मालमत्तेविषयी कायद्ये, गरजेपुरते वस्तूविनमय, यावर अत्यंत महत्त्वाचे विचार प्रकट केले आहेत. याशिवाय ते म्हणतात, उद्योगाची वाटणी म्हणजे उत्कृष्ट देशव्यवहारव्यवस्था होय. भारतीय शेती सुधारणेविषयी अर्थशास्त्रीय दृष्टिकोणातून विचार मांडणारे हे महत्त्वाचे साहित्यिक आहेत.कृष्णशास्त्री चिपळूणकर हे महत्त्वाचे साहित्यिक आहेत. त्यांनी शाळापत्रक नावाचे नियतकालिक काही दिवस मोठया कष्टाने चालविले. त्यांनी' संपत्तीचे उत्पत्तीस कारण जो श्रम त्याविषयीं विचार' हा लेख अर्थशास्त्रीय दृष्टिकोणातून लिहिला आहे. यामध्ये साधन संपत्तीचे उत्पादन वाढण्यासाठी त्यांनी उपाय सूचविले आहेत.कोणतेही उत्पन्न उत्पादीत करीत असतांना त्याचे पाच प्रकार असतात असे विचार या लेखात सांगितले आहेत.

१) द्रव्योत्पादक श्रम २) सुलभत्व आणणारे श्रम ३) संरक्षण श्रम ४) वहन श्रम ५) धनोत्पादक श्रम कृष्णशास्त्रीचे हे अर्थशास्त्रीय विश्लेषण आजही विचार करावयास लावणारे आहे.

या काळातील वैचारिक साहित्यात भारतीय समाज व्यवस्थेतील स्त्रियांचे दुय्यम स्थान, त्यांच्या शोषणाचे स्वरुप , पुरुषप्रधान संस्कृतीत भरडलेले जीवन,धर्मग्रंथांनी दिलेला शुद्रत्वाचा दर्जा इत्यादी घटकांची चिकित्सा केली आहे. या दृष्टिने काही विचार या ग्रंथातील लेखात आले आहेत. 'स्त्रीविद्याभ्यास : शंकानिवारण' या गद्यवेच्यामध्ये बाबा पदमनजी यांनी दोन पिढीतील वैचारिक विषमता तरुण विद्वान व वृध्द गृहस्थ यांच्या संवादामधून स्पष्ट केली आहे. तरुण विद्वानाने भागिरथीला ,काय मुली ,तुला तें पत्र वाचायास येत नाही ? हा प्रश्न विचारला त्यास उत्तर देतांना ती म्हणते, नाहीं महाराज, आणि आम्हा मुलीच्या जातीस कशास वाचणें पाहिजे ?या उत्तरातून तत्कालीन स्त्री शिक्षणाकडे पाहण्याची दृष्टी लक्षात येते.तर्कशुध्द, बुध्दीमान, अभ्यासू, असा पुरोगामी विचारांचा तरुण विद्वान स्त्री विषयक खंडन- मंडनात्मक प्रगमनशील विचार मांडताना दिसतो. तर कर्मठ धार्मिकता,पुरुषी अहंकारी मानसिकता असणारा प्रतिगामी विचारांचा वृध्द गृहस्थ यांच्या संवादातून तरुण विद्वान शास्त्रातील एकांगी रचनेचा उहापोह करतो. आणि त्या वृध्द गृहस्थाचे मन परिवर्तन करतो. या लेखातून बाबा पदमनजी यांनी सूचक सुधारणेचा आग्रह धरला आहे.रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांनी विविधज्ञानविस्तार या मासिकात वेळोवेळी स्त्रीशिक्षणसंबंधी लिहिलेले लेख 'गृहिणी आणि माता' या गद्यवेच्यामध्ये समाविष्ठ केलेले आहेत. 'स्त्रीचे तेंज' या लेखात स्त्रीयांची महती वर्णलेली आहे. लेखक म्हणतात, मनुष्य कोणच्याही स्थितींत असला तरी त्याची स्त्री जर मनाची स्थिर, निश्चयी आणि मितव्ययी आहे, तर त्याला धैर्य सोडण्याचे कारण नाहीं. मनुष्याच्या संसारात गोडी गुलाबीचे आणि समाधानीचें स्थान असलें पाहिजे. अशा ठिकाणी त्याच्या अंतरात्म्याला आल्हाद मिळतो व त्यास दुप्पट बळ येते. ज्याला संसाराची फारशी काळजी नाही, अशाही अनेक लोकांची अशीच स्थिती आहे. याचे करण स्त्रीचे तेंज. 'मुलीचें लग्न ' या लेखात मुली आणि मुलांच्या लग्नातील विषमता स्पष्ट करुन मुलीच्या जाण्याने आईवडीलास होणारा वियोग , त्याची पार्श्वभूमी विलक्षण गहिवरुन टाकणारी आहे. आई आणि मुलीच्या नात्याची नाजूकता हळूच उलगडतांना दिसते. 'माता आणि बालक' या लेखात मातेचा बालकावर होणारा परिणाम व्यक्त केला आहे. लेखक म्हणतात, मातेचे हास्यवदन, तिचे उत्तेजनयुक्त भाषण, तिचे प्रेमळ चुंबन, तिचे मायाळू दटावणे, तिचा शांत राग यांचा त्या बालकावर रोपावर जसा निसर्गाचा सहजसुलभ परिणाम होतो तसा होतो. मुलांना शिक्षण देण्याला मातेसारखा दुसरा शिक्षक नाही. हे त्यांचे दृष्टेपण आजही योग्यच ठरते. 'पुनर्विवाहप्रतिबंधामुळे अनर्थ' या लेखात भाऊ महाजन यांनी विधवा पुनर्विवाहास प्रेरणा दिली आहे. यासाठी त्यांनी आवास गावातील ब्राह्मण जातीतील दोन विधवा स्त्रीया पुनर्विवाहासाठी धर्मांतर करतात. याचा दाखला दिला आहे. धर्मांतर टाळावयाचे असेल तर विधवा पुनर्विवाह होणे आवश्यक असा सूचक सल्ला या लेखात आहे.

माणूस हा समाजाचा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. या माणसांचे माणूसपण हिरावून घेऊन त्याला गुलाम बनविणारी व शोषणाचा पाया असाणारी जातीव्यवस्थेची अमानुष प्रथा कशी निर्माण झाली या विषयी या ग्रथांत माहिती आली आहे. भाऊ महाजन हे प्रभाकर या नियतकालिकाचे संपादक होते. या गद्यवेच्यामध्ये एकूण सहा लेख असून त्यापैकी एक लेख प्रभाकर व बाकीचे धूमकेतू या नियतकालिकामध्ये प्रसिध्द झालेले आहेत. त्यांनी 'जातिमात्र विद्यापात्र' या लेखात भाऊ महाजन यांनी सर्वांना संस्कृत भाषा शिकविण्याचा आग्रह धरला आहे. तुकाराम तात्या पडवळ हे म. फुले यांचे सहकारी होते. 'जातिभेद विवेकसार' या ग्रंथाची दुसरी आवृती म. फुले यांनी १८६५ साली स्वतः प्रकाशित केली आहे.या ग्रंथात हिंदू धर्मातील जातीजातीमधील उच्च -निच्चत्वाची मुद्देसुद मांडणी केलेली आहे. वेगवेगळया प्रदेशातील ब्राह्मणाच्या आचरणातील विषमतेवर प्रकाश टाकला आहे. संस्कृतमधील वज्रसूचि या ग्रंथाचा आधार घेऊन लिहिलेला हा ग्रंथ अभ्यासपूर्ण आहे.हे पुस्तक ब्राह्मणेतर चळवळीचा मूलस्त्रोत मानले जाते. लेखक जातीभेदाला सर्व दुःखाचे मूळ मानतो.

समाजव्यवस्थेत देव व धर्म या संकल्पना अस्तित्वात असतात. त्यांचा समाजाच्या सर्व स्तरावर खोलवर प्रभाव असतो. धर्मसत्तेच्या माध्यमातून विलासी व ऐश्वर्यसंपन्न जीवन जगण्यासाठी धर्मगुरींनी खरा धर्मविचार बाजूस सारला आहे. स्वतःचे व्यक्तिमहात्म्य वाढविले आहे याचे चित्रण या ग्रंथात आहे. 'गुजराथ्यांचे महाराज आणि इतर लेख' या गद्यवेच्यामध्ये गुजराथ्यांचे महाराज म्हणजे गुजराथी लोकांचे गुरु होय. त्यांच्या दिनचर्येचे व रात्रीचर्येचे वर्णन या लेखात आले आहे.महाराजांची दैवाधीन, ऐशआरामी, आळशी, शोषणाधिष्ठीत, व्यसनाधीन जीवनशैली व अज्ञानी समाजाचे शोषण यांचे चित्रण प्रत्ययकारी आहे.

नारायण विष्णु जोशी यांनी लिहिलेल्या पुणे शहराचे वर्णन , भाग दुसरा यामधून 'पुणे शहर आणि शनवारवाडा'हा गद्यवेचा घेतला आहे. यामध्ये पेशवे व पुणे शहराच्या वैभवाच्या चित्रण करण्यात आले आहे. तसेच पेशव्यांचा इतिहास वर्णलेला आहे. बाळाजी विश्वनाथ हा कोंकणस्थ ब्राम्हण श्रीवर्धन येथे राहत होता. त्यास पेशवाई कशी प्राप्त झाली याचा संक्षिप्त आढावा घेतला आहे.पेशव्यांनी बांधलेला शनवार वाडा बांधण्याची जागा, मुर्हूत,नारळाचा प्रसाद, गणपती रंगमहाल, लाकडी नक्षीदार छत, वाडयातील कलाकुसर, चित्रे, भाद्रपद महिण्यातील अकरा दिवसाचा उत्सव याचे वर्णन ओघवत्या शैलीत केले आहे. त्या पाठीमागच्या अख्यायिका सांगितल्या आहेत.सीताराम रामचंद्र गाईकवाड यांच्या पुणे शहर -भाग २ या मधून 'खडकीची लढाई व पेशव्यांचे वंशाचा शेवट' गद्यवेचा घेतला आहे. खडकीची लढाई झाली . या लढाईत इंग्रज विजयी झाले. त्यांचा अंमल सुरु झाला या कारण बाजीराव पेशवे कसे आहेत. हे या गद्यवेच्यात तपशीलवार सांगितले आहे.दैववादी, विलासी,चैनी, जीवनशैली असणा-या बाजीरावांचे वर्णन लेखक करतात, बापू गोखले इंग्रजाविरुध्द बंड करीत असतांना त्यांना बाजीरावांनी मदत करावयाची सोडून ते , अमुक ब्राम्हणास दक्षिणा वांटा, अमुक अन्नछत्रे घाला, अमुक देव प्रसन्न करुन घ्या ,वगैरे आळशी गप्पा असत या आळणी रावबाजीमुळे बापू गोखल्याच्या अंगाची आग होई. यात वेळ गेल्यामुळे इंग्रजांनी आपली सर्व सिध्दता तयार केली. पेशवाईचा शेवट झाला . याचे वर्णन करतांना लेखक म्हणतात, हाय हाय श्रीमंती गेली हो गेली.

एकोणिसाव्या शतकातील मराठी गद्य (खंड-१) या भास्कर भोळे संपादीत ग्रंथामधील सर्व वेचे हे वैचारिक आहेत. यामध्ये प्रामुख्याने शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय विषयांवरील गद्यांची निवड करण्यात आली आहे.हे वेचे म्हणजे ब्रिटिश राजवटीशी स्थानिक समाजाच्या झालेल्या क्रियाप्रतिक्रियांचा इतिहास म्हणता येईल. भारताच्या आणि महाराष्ट्राच्या दृष्टीने एकोणिसावे शतक हे केवळ सत्तांतराचे शतक न ठरता ज्ञानविस्ताराचे, नवजाणिवांचे,विचारप्रवाहांमधील अंतःकलहांचे, आत्मपरीक्षणाचे आणि मूलभूत प्रश्नांना भिडण्याचे शतक ठरले होते. याचे प्रतिबिंब या संपादीत ग्रंथात पडले आहे.

**संदर्भ :-**

१) भोळे, भास्कर(संपा.)-एकोणिसाव्या शतकातील मराठी गद्य,साहित्य अकादेमी, २०१२.
२) जोशी,ना.वा.-पुणे वर्णन (संपा-ठाकूर रवींद्र) मुद्रा प्रकाशन,कोल्हापूर, २००१
३) भावे, वा.कृ.- पेशवेकालीन महाराष्ट्र, भारतीय इतिहास अनुसंधान परिषद, नवी दिल्ली,१९७६